


# छत्रपती राजर्षी शाहू महाराज यांचे आर्थिक विचार

संपादक
प्रा. डॉ. परशुराम पाटील

ISBN No. 978-81-955479-6-8

# छत्रपती राजर्षी शाहू महाराज यांचे आर्थिक विचार

**प्रा. डॉ. परशुराम पाटील**
अर्थशास्त्र विभागप्रमुख, श्री योगानंद स्वामी महाविद्यालय,
वसमतनगर, जि. हिंगोली.
मो. नं. ९४२३५९८६२४

**प्रकाशक**
**सिध्दी पब्लिकेशन हाऊस**
**६२४, बेलानगर, भावसार चौक,**
**तरोडा (खु.) नांदेड ३ ४३१६०५**
**मो. ९६२३९७९०६७**
**www.wiidrj.com**

**मुद्रक**
**अनुपम प्रिंटर्स , श्रीनगर, नांदेड (महा.)**
**९१७५३३२४४३७**

**प्रथमावृत्ती : २६ जून २०२२**
**© सर्वाधिकार : संपादकाधीन**

**मुखपृष्ठ : तेजस रामपूरकर**

**अक्षरजुळवणी : डॉ. राजेश उंबरकर**

**मूल्य : ३०० /-**
**(या ग्रंथातील लेख संबंधीत लेखकांचे आहेत. संपादक - प्रकाशक त्यांच्याशी सहमत असतीलच असे नाही. )**

# अनुक्रमणिका


| अ.क | लेखांची नावे | लेखक | पृष्ठ क्र. |
|---|---|---|---|
| ०१. | CHHATRAPATI SHAHU MAHARAJ AND HIS VIEWS ON EDUCATION AND ITS RELEVANCE TO MODERN ERA | Dr. Sudam Laxmankumar | २३ |
| ०२. | ECONOMIC REFORMS OF CHHATRAPATI SHAHU MAHARAJ FOR THE UPLIFTMENT OF SOCIETY | Dr. Ashok Tiparse | २९ |
| ०३. | EDUCATIONAL THOUGHTS OF RAJARSHI SHAHU MAHARAJ | Dr. Kirtankar R.V. | ३४ |
| ०४. | A MULTIFACETED PERSONALITY OF RAJARSHI SHAHU CHHATRAPATI OF KOLHAPUR – AN ANALYTICAL OVERVIEW | Prof. Khokale Dadaram Laxman<br>Prof. Patkar Kalpesh Dilip | ४४ |
| ०५. | ROLE AND CONTRIBUTION OF CHHATRAPATI SHAHU MAHARAJ FOR THE BENEVOLANCE OF WOMEN | Dr. Prasad A Joshi | ५१ |

| | | | |
|---|---|---|---|
| ०६. | "दुर्बल घटकांचे कैवारी राजर्षी शाहू महाराज" | डॉ. रंदिल गजेंद्र साहेबराव | ६६ |
| ०७. | समतावादी लोकराजा – राजर्षी शाहू | प्रा. सचिन जयस्वाल | ७२ |
| ०८. | छत्रपती शाहू महाराज यांचे धर्मसुधारणासंबंधी योगदान | डॉ. दिलीप सावंत | ७९ |
| ०९. | छत्रपती शाहू महाराजांच्या आर्थिक धोरणाचा चिकित्सक अभ्यास | प्रा. डॉ. माधव कदम | ९८ |
| १०. | राजर्षी शाहू महाराज यांची जलनीति | डॉ. रमाकांत शिवाजीराव शातलवार | ११३ |
| ११. | द्रष्टा समाज सुधारक राजर्षी शाहू महाराज | प्रा. डॉ. शेकोबा परशुराम ढोले | ११९ |
| १२. | लोककल्याणकारी राजा छत्रपती शाहू महाराज | प्रा. डॉ. दिलीप साहेबराव काकडे | १२९ |
| १३. | राजर्षी शाहू महाराजांचे शैक्षणिक कार्य | डॉ. सौ. कुलकर्णी एस. एन | १४० |
| १४. | शाहू छत्रपतींचा वसा आणि वारसा आपण जपायला हवा | प्रा. आर. एस. माने | १४४ |
| १५. | "राजर्षी शाहू महाराज यांचे आर्थिक विचार" | बालाजी उत्तम आसोरे | १५५ |
| १६. | राज्यश्री शाहू महाराजांचे स्त्री सुधारणा विषयक कायदे | डॉ. संजीवनी चंद्रशेखर बारहाते | १६४ |
| १७. | राजर्षि शाहू महाराज यांचे शैक्षणिक विचार | वीणा विष्णू केरीकर | १७१ |

| | | | |
|---|---|---|---|
| १८. | शेतीनिष्ठ शेतकरी राजा - राजर्षी शाहू महाराज | प्रा. डॉ. नितीन बावळे | १८१ |
| १९. | राजर्षी छत्रपति शाहू महाराजांचे शैक्षणिक विचार | प्रा. डॉ. संजय मधुकरराव साळवे | १८९ |
| २०. | "छत्रपती शाहू महाराजांचे जलधोरण" | प्रा. कुमारे लक्ष्मण नागोराव<br>प्रा. अशोक प्रबती कांबळे | १९५ |
| २१. | राजर्षी शाहू महाराज आणि ग्रंथालय चळवळ | प्रा. मंगेश रामराव भित्रे | २०६ |
| २२. | राजर्षी शाहू महाराज यांचे शेती विषयक विचार | डॉ. विजय शंकर शिंदे | २१० |
| २३. | "राजश्री शाहू महाराजांचे कामगार विषयकधोरण" | प्रा. यादव धोंडूजी मोरे | २१५ |
| २४. | राजर्षी शाहू महाराज कृषी व उद्योगाचे प्रणेते | डॉ. राजेश गं. उंबरकर | २२० |
| २५. | राजर्षी शाहू महाराजांचे स्त्रीयां विषयीचे कार्य | डॉ. टेंकाळे सुवर्णा उमाकांत | २२५ |
| २६. | राजर्षी शाहुमहाराजांचे आर्थिक विचार | प्रा. डॉ. डी. पी. कांबळे | २३१ |
| २७. | समाजिक परिवर्तनासाठी आवश्यक धोरण: राजर्षी लोकराजा छत्रपती शाहु महाराजांचा न्याय्य विचार व कृतिशिलता | प्रा. डॉ. रोहीत गायकवाड | २३९ |
| २८. | राजर्षी शाहू महाराज यांचे आर्थिक विचार : एक दृष्टिक्षेप | प्रा. डॉ. परशुराम पाटील | २४६ |

# समाजिक परिवर्तनासाठी आवश्यक धोरण: राजर्षी लोकराजा छत्रपती शाहु महाराजांचा न्याय्य विचार व कृतिशिलता

**प्रा. डॉ. रोहीत गायकवाड**

तत्वज्ञान विभाग, सोनोपंत दांडेकर महाविद्यालय पालघर

**प्रस्तावना :**

भारतीय सामाजिक संरचनेत शुद्रातिशुद्र हा शेवटचा घटक आहे. त्यांच्यावर विविध घटकवर्गांनी लादलेली गुलामगिरी व अस्पृश्यता अत्यंत हिन व अमानवी अशाच स्वरूपाची होती. तिला ईश्वर व शास्त्रसंमत ठरविल्यामुळे शोषित व शोषक या कोणाचीच याबाबत तक्रार नव्हती. मात्र कालार्धात गुलामगिरी व अस्पृश्यतेचे स्वरूप व मर्यादा इतकी व्यापक झाली की, भारतातील खुप मोठा वर्ग या अमानवी प्रथेमुळे भरडला जावू लागला त्यांचे मुलभूत हक्क नाकारले गेले. त्यांचे अस्तित्व टिकवून ठेवण्याचे अधिकारही अत्यंत निष्ठूरपणे नाकारले गेले. गुलामगिरी व अस्पृश्यता या वर्गाने स्विकारली नव्हती ती त्यांना धार्मिक, शास्त्रीय व देवसंमत आज्ञाचा हवाला देऊन स्विकारण्यास मानसिकदृष्ट्या, सामाजिकदृष्ट्या तयार करण्यात आले होते. जगण्याचा हक्क व जिविताची हमी नाही. सामाजिक परिघाबाहेर फेकला गेलेला हा समुदाय मानवी हक्क प्राप्त करण्यासाठी अधुनमधुन व्यक्तीगत तर कधी सामुदायिक पातळीवर बंडकर्ता (बंडखोर) ही झालेला आहे. मात्र शोषक वर्गाची संघटित सुस्थापित शक्तीमुळे या पिडित व शोषित वर्गाला भरीव यश मिळाले नाही. परिणामी दलित शुद्रातिशुद्रांच्या वस्त्या गावकुसाबाहेर ठेवल्या गेल्या. अमेरिकन Nigroविभक्त होते. पण समान होते. (Separate but Equal)पण भारतीय दलित वर्ग मुख्य वर्गापासून विभक्त होता व असमान होता. त्यांच्या सोबत प्रत्येक बाबतीत असमानता होती. त्यांच्यावर विविध काळात सामाजिक, आर्थिक, धार्मिक, सांस्कृतिक, शैक्षणिक, अध्यात्मिक बंधणे घालुन त्यांच्यावर त्यांचे अस्तित्वाचे सर्व मार्ग बंद करण्यात आले होते. आणि जगायचेच असेल तर 'हाच माझा धर्म व हिच भगवंताची इच्छा' समजून जगावे हेच त्यांच्या वाट्याला

आले होते. भारतीय समाजाचा मोठा घटक असुनही केवळ वर्ण व जाती व्यवस्थेच्या मानवनिर्मित बंधनामुळे व अनैसर्गिक धार्मिक नियमांमुळे त्यांची कोणत्याच प्रकारची प्रगती होऊ शकली नाही. त्यामुळे भारतीय समाज व्यवस्था अपरिवर्तनीय (Rigid) बनली व त्याचा परिणाम असा झाला की सत्ता (Power) संपत्ती (Wealth)प्रतिष्ठा (Privilage) व संधी (Opportunity) यांची असमान वाटणी झाली. भारतीय समाजाच्या वर्णाश्रमधिष्ठित उतरंडी नुसार सर्वात खालच्या अतिशुद्र व अस्पृश्य वर्गाला ज्याप्रमाणे माणुसपणं नाकारले गेले तसेच मानवी व सामाजिक उन्नयनाचे दोन महत्वाचे मार्ग शैक्षणिक शिक्षण व आर्थिक स्वातंय नाकारले गेले. हा वर्ग वर्ण व जात या कारणांमुळे विकासाच्या प्रवाहात येऊच दिला नाही. त्यांचे शिस्तबद्ध पद्धतशीर सामाजिक बाहेरीकरण (Social extinction exclusion) करण्यात आले. त्यामुळे त्यांच्यात कमालीचे दारिद्र्य, जगण्याची संधी व इच्छा मरणघटका मोजत राहीली.

**जातींच्याश्रमविभागणीचा परिणाम:**

मुळात जातीच्या आधारावरील श्रमविभागणी जातीनिहाय बंधणामुळे मागास शुद्रातिशुद्राच्या आर्थिक प्रगती व विकासाला खिळ बसली. व्यवसाय स्वातंय नाकारले गेल्यामुळे व्यवसायाचे स्थिरीकरण झाले त्यामुळे एकुणच समाजाच्या व देशाच्याही आर्थिक विकासाला मर्यादा आली.

**शैक्षणिक व धार्मिक विशेषाधिकार:**

उच्चवर्णीयांसाठी शिक्षण, धर्म व आर्थिक अधिकार शास्त्रसंमत ठरविल्यामुळे व दलितवर्गाचे हेच अधिकार नाकारल्यातुळे त्या वर्गात कोणत्याच प्रकारचा विकास होऊ शकला नाही.

**अर्थार्जन व मानाने जगण्याचा अधिकार:**

हे प्रत्येक व्यक्ती व समुदायाच्या सर्वांगिण उन्नयनासाठी आवश्यक घटक आहेत मात्र अस्पृश्य वर्गाला अर्थार्जन करण्याचा अधिकार पूर्णपणे नाकारण्यात आला. धनसंचय करता येणार नाही यासाठी मनुस्मृती सारख्या शास्त्रांचे दाखले देण्यात आले.

एव्हढेच नाही तर अस्पृश्यांना नवे कपडेही घालता येणार नाही. त्यांनी शुभ व आकर्षक नावे ठेवू नयेत. त्यांनी अंगभर पूर्ण वस्त्रे घालू

नयेत गावातील मुख्य रस्त्याने जावू नये, पादत्राणे घालू नये, गळ्यात मडके व कमरेला झाडू, उच्चजातीय लहान मुलालाही आदरसुचक असेच संबोधने अशा प्रकारची असंख्य बंधणामुळे अस्पृश्य समाज नरकयातना सहन करत होता. त्यांना सामाजिक व व्यक्तीगत प्रगतिच्या सर्वच संधी व स्वातंय नाकारल्यामुळे त्यांच्या जगण्याला कवडीची किंमत उरली नव्हती.

**संतांचे कार्य:**

संतांनी विशेषत: महाराष्ट्रातील संतांनी समानतेचे तत्व समाजात रूजविण्याचा प्रयत्न केला मात्र त्यात भरिव यश मिळू शकले नाही. संतांची भुतदयावादी शिकवणूकीमुळे वर्णवर्चस्ववादी समाजावर काहीच परिणामहोऊ शकला नाही.

**महात्मा ज्योतिबा फुले यांची समाजपरिवर्तनासाठीची दिशादर्शक कामगिरी:**

म. ज्योतिबा फुले यांनी भारतीय समाजाच्या विशेषत: शेतकरी व अस्पृश्य वर्गाच्या दयनीय स्थितीचे बारकाईने निरिक्षण करुन उत्कृष्ट भावनेने या वर्गासाठी भरीव कार्य केले. शेतकरी व दलित वर्गाच्या दारिद्र्याची कारणे शोधून शिक्षण हा सर्वागिंण विकासात खूप मोठा अडसर मानुन सामाजिक व शैक्षणिक जागृती केली. प्रस्थापित समाज व्यवस्थेवर कोरडे ओढून प्रत्यक्ष शाळा सुरु केल्या. समाजात समानता, बंधुभाव, न्याय निर्माण झालाच पाहिजे ही त्यांची आग्रही भूमिका होती. त्यांच्या विचारांचा व कृतींचा खूप मोठा प्रभाव राजर्षी शाहु महाराज यांच्या जीवन व कार्यावर झाला.

**संधीची समानता:**

मिळाली तर प्रत्येकजण आपला व समाजाचा विकास साधु शकतो हे महात्मा फुले यांचे मुलतत्व होते. (सर्व जाती निवडून। द्याव्या संख्याप्रमाण।।)याद्वारे ते प्रत्येकाला समानसंधी द्यावी असेच सुचवितात.

**ब्रिटीशकालीन सामाजिक परिवर्तनाची स्थित्यंतरे:**

ब्रिटीश लोकशहीवादी असूनही त्यांनी कधीच दलीतांसाठी शिक्षणाची एक प्रभावी व्यवस्था निर्माण केली नाही. उलट त्यांच्याही सत्ताकाळात अस्पृश्यांच्या समस्या कमी झाल्या नाही. मात्र महात्मा फुलेंनी एकीकडे दलितांना आत्मभान दिले. त्यांच्या मानवी

हक्कांविषयी जागृत केले. अस्पृश्यांचे शेतकरी वर्गाचे डोळे उघडावेत यासाठी गुलामगिरी सारखे ग्रंथ लिहिले. शाळा सुरू केल्या, तर दुसऱ्या बाजुला १८८२च्या हंटर कमीशन पुढे अस्पृश्यांच्या हितासाठी गाऱ्हाणे मांडले सरकारने शिष्यवृत्त्यांसोबतच अस्पृश्य वर्गाच्या सर्वकष कल्याणासाठी विशेष आर्थिक तरतुद केली पाहीजे असा आग्रह धरला त्याचा सकारात्मक परिणाम पुढील काळात दिसून आला.

**आरक्षण सामाजिक परिवर्तनाचे सर्वाधिक प्रभावी माध्यम :**

महात्मा फुले यांच्या चौफेर कार्यामुळे अस्पृश्यांच्या वेदनांची त्यांच्या समस्यांची चर्चा झाली. त्यानिमित्ताने समता, बंधुता, समानता, शिक्षणाविषयीचा हक्क यासंबंधी राजर्षी शाहु महाराजांनी देशात प्रथमच कोल्हापूर संस्थानात ५० टक्के सरकारी नौकऱ्या मागासवर्गासाठी आरक्षित करून एक क्रांतिकारी पाऊल टाकले. त्यानंतर १९२० नंतर इतर संस्थानिकांनी कमी आधिक प्रमाणात असे निर्णय घेतले.

**राजर्षी छत्रपती शाहुजी महाराज: समाताधिष्ठित अधिष्ठाण:**

महाराजांनी कोल्हापूर संस्थानात प्रथमच ५० टक्के आरक्षण धोरण आखूण प्रभावीपणे राबविले. त्यांनी दिनदलित समाजाला सहन करावा लागणारा छळ, अत्याचार, आणि पूर्णपणे संधी नाकारल्याने जगावे लागणारे अमानवी जीवन हे प्रत्यक्ष स्वत: बघितल्यामुळे या समाजाप्रती त्यांच्या मनात अतीव आदर व कणव होती. जे इतिहासाने नाकारले त्यांचे भविष्यातील जीवन सुसह्य केले पाहिजे या हेतुने त्यांनी सरकारी पातळीवर जेजे म्हणून या दुबळया समाजासाठी करता येईल ते त्यांनी केले. स्वत: शासक असूनही वर्णधर्माच्या नियमानुसार त्यांनाही बराच भेदभाव सहन करावा लागला. तर या सामान्य मुल्यहिन समाजाला हे जातीभेदाचे चटके सहन करावे लागत असतील या तीव्र भावनेतुन त्यांनी आरक्षणासमवेत त्यांच्या हितांचे अनेक निर्णय घेतले. सर्व मानव समान आहेत. सर्वांना समान संधी मिळाली पाहिजेत. जात व वर्णावरून कुणालाही शिक्षण, नोकरी किंवा व्यवसाय स्वातंय नाकारले जाता कामा नये या व्यवहार व नितीनियमाने त्यांनी आपली धोरणे ठरविली. याकरता शाहुंनी १३ व १५ मे १९२० च्या गॅझेटमध्ये वेठबिगारी प्रथा बंद केल्याचा हुकूम प्रसिद्ध केला. अस्पृश्य वर्गातील कोणत्याच व्यक्तीला वेठबिगारी करता सेणार नाही त्यांना

निष्ठूरपणे वागविता येणार नाही. त्यांच्या इच्छेविरुद्धकाम करून घेता येणार नाही व असे जर करतांना कोणी आढळले तर त्याला जबर शासन करण्याची तरतुद महाराजांच्या आज्ञेत होती. त्यामुळे अस्पृश्य वर्गाला खुप मोठा दिलासा मिळाला व आपली दुःख व दैन्य जाणणारा लोकराजा आहे. त्यामुळे त्यांच्यात आत्मभान निर्माण होऊ लागले आणि त्यायोगे महाराजांनी किमान कोल्हापूर संस्थानातील अस्पृश्याची गुलामगिरी पूर्णपणे संपविली.

महाराजांनी अनेक अस्पृश्य परिषदांना हजेरी लावून त्यांच्यात स्वाभिमान निर्माण करण्याचा प्रयत्न केला. मी तुम्हाला अस्पृश्य समजत नाही तुम्ही इतरांपेक्षा निश्चितच बुद्धिवान, पराक्रमी व स्वार्थत्यागी आहात ''आपण सर्व भावंडे आहोत'' अशा प्रकारे दलितांप्रती आदराची भावना व्यक्त करुन त्यांनी तशी प्रत्यक्ष कृती करून दाखविली.

अस्पश्यता हा कलंक आहे व कोणीही माणसांनी ती पाळू नये. जो शिवाशीव व अस्पृश्यता पाळेल त्याला जबरी शिक्षा देण्याची तरतुद करणारा आदेश १ जाने १९१९ रोजी काढला.
अस्पृश्य वर्गासाठी मोफत शिक्षणासंबंधीचा आदेश २४ नोंव्हे. १९११ रोजी काढून त्यांना शिष्यवृत्ती जाहीर केली. अस्पृश्य गणल्या गेलेल्या सर्वच जातींसाठी त्यांना शाळा, वस्तीगृहे सुरु करून हजारो वर्षापासून बंद असलेले शिक्षण या वर्गासाठी सुरू केले.

महाराजांच्या संस्थानात खऱ्या अर्थाने सामाजिक परिवर्तनाला महाराजांनी विविध आदेश काढून सुरुवात केली. महिला व शुद्र तसेच शेतकरी वर्गासाठी त्यांनी कठोर निर्णय घेतले. त्या निर्णयामुळे प्रस्थापित वर्गाने नाराजी दाखविली. महाराजांच्या ब्रिटीशांकडे खुप तक्रारी केल्या पण महाराज बधले नाहीत त्यांनी स्त्री शुद्राच्या व शेतकऱ्यांसाठी मोठ्या प्रमाणात जोमाने कार्य पूढे नेले.

विधवा स्त्रियांच्या पुनर्विवाहाला कायदेशिर मान्यता देणारा कायदा त्यांनी पास केला. तसेच १९१९ मध्ये आतंरजातीय विवाहास मान्यता देणारा कायदा पास केला.

महाराष्ट्रातील समाजजीवनाच्या तत्कालिन कर्मठ परिस्थितीत शाहु महाराजांनी स्त्रियांच्या सन्मानाविरूद्धच्या व दलित वर्गास अपमानकारक व त्याचे हक्क नाकारणाऱ्या प्रथा, परंपरा

कायद्याद्वारे नष्ट केल्या त्यामुळे खऱ्या अर्थाने महाराष्ट्रात सामाजिक परिवर्तन घडून आले. समाजपरिवर्तन करण्यासाठी आवश्यक राजकीय इच्छा शक्तीमुळे व त्यांच्यात दीनदलीतांप्रतीच्या संवेदनेमुळे महाराष्ट्रीयन समाजात परिवर्तनाचे अनेक चांगले परिणाम दिसून आले.

**आरक्षण: सार्वजनिक सेवांमध्ये सामान्यांचे प्रतिनिधित्व**

प्रत्येकाला शासन व प्रशासनात समान संधी मिळविण्यासाठी 'समानसंधीसाठी विशेष संधी हा आरक्षणाचा मुलभूत पाया आहे. असे झाले नाही तर सामाजिक वगळणे (Social Exclusion)घडते जे भारतीय समाज अनुभवत आला आहे व त्यामुळेच अर्मत्य सेन म्हणतात त्याप्रमाणे, "Social Exclusion leads to deprivation and limits our living opportunity"हे न घडण्यासाठी शिक्षण व आरक्षण अत्यंत आवश्यक आहे.

**शाहु महाराजांच्या आरक्षण धोरणाचा समाज जीवनावरील परिणाम:**

शाहु महाराजांनी आरक्षण धोरणाची काटेकोर अमंलबजावणी केल्यामुळे अस्पृश्य वर्गाचेSocial exclusion(सामाजिक अंतर्भाव) व्हायला सुरूवात झाली. अस्पृश्यांचे प्रत्येक सरकारी कार्यालयात प्रतिनिधित्व दिसू लागल्यामुळे उच्चवर्णीयांचा व दलितांचाही दृष्टिकोन बदलु लागला. आरक्षण धोरणामुळे स्वातंयप्राप्तीनंतर शाहु, फुले व आंबेडकर यांच्या प्रयत्नामुळे अस्पृश्यांच्या जीवनमान व सामाजिक दर्जा यामध्ये खुप सकारात्मक परिणाम झाला. शाहु महाराजांच्या आरक्षण धोरणाला संविधानिक तरतुदीद्वारे मुर्त रूप दिल्यामुळे हे धोरण राष्ट्रीय स्तरावर स्विकारले गेले आणि पूर्ण देशभरातील शुद्रातिशुद्राना सरकारी नोकऱ्यांची दारे खुली झाली.

शाहु महाराजांच्या संकल्पनेतील आरक्षणाची तरतुद कलम ३३१, ३३०, ३३२, ३३४ नुसार तसेच कलम ३३८(१) या कलमाद्वारे संविधानिक व शासनसंमत करण्यात आली.

**निष्कर्ष:**

शाहु महाराज यांच्या आरक्षणाच्या धोरणात्मक निर्णयाचा परिणाम केवळ कोल्हापूर संस्थानापूरता न राहता त्याला संविधानाच्या तरतुदीमुळे राष्ट्रीय स्वरूप आले व देशभरातील दलित, आदिवासी, व

इतर मागासवर्गीयांना समान संधी देण्याच्या हेतुने मुख्य प्रवाहात आणले गेले. १९०२ ते १९९० या कालखंडात अनेक मागासवर्गीयांना शिक्षणाची संधी मिळाली व सरकारी नोकऱ्या मिळाल्या. महाराष्ट्रातील दलितांमध्ये आत्मभान व स्वाभिमान जागृत झाल्यामुळे केवळ त्यांची आर्थिक उन्नती साधली असे नव्हे तर त्यांच्यात सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक जागृती निर्माण झाली.

**संदर्भ:**


१. धनंजय किर, राजर्षी शाहु महाराज पॉप्युलर प्रकाशन (२०१६).
२. शरद जावडेकर / वसुधा जोशी /रविंद्र म्हसरे सामाजिक परिवर्तन चिकित्सा आणि भवितव्य, (२००९),भ. श. भगणे गौरव ग्रंथ सुगावा प्रकाशन
३. डॉ. अनिल कठारे, महाराष्ट्राचा इतिहास, (२०१८), कल्पना प्रकाशन.
४. पवार जयसिंगराव (संपा), (२००७), राजर्षी शाहु स्मारक ग्रंथ, महाराष्ट्र इतिहास प्रबोधिनी कोल्हापूर पृ. कं. १२०.
५. ठोसर संगिता, कुलकर्णी दिपाली, (२०१२), राजर्षी शाहु आणि स्त्री प्रश्न चिन्मय प्रकाशन औरंगाबाद (राजर्षी शाहु महाराज व वर्तमानातील संदर्भ)